## शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,

**मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१.**

## जाहीर प्रकटन,

### इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२६-२७

शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील इयत्ता ११ वी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेकरीता विद्यार्थ्यांकरीता प्रवेश अर्जाचा भाग-१ भरण्याची सुविधा दिनांक १० एप्रिल २०२६ पासून माध्यमिक व उच्च माध्यमिक राज्य मंडळ, पुणे यांचा इयत्ता १० वी चा निकाल जाहिर होई पर्यंत देण्यात आली होती. दिनांक १०/०४/२०२६ ते ०८/०५/२०२६ पर्यंत एकूण ७,७४,९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-१ भरुन नोंदणी केलेली आहे.

दिनांक ०८/०५/२०२६ रोजी इयत्ता १० वी चा निकाल जाहिर झालेला आहे. दिनांक ११ मे २०२६ पासून इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा भाग-१ आणि भाग-२ भरुन इयत्ता ११ वी मध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश नोंदणी करण्याची सुविधा -https://mahafyjcadmissions.in या **अधिकृत पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**

सदर प्रक्रियेमध्ये तीन नियमित फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी, मुलींकरीता विशेष पाचवी फेरी घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी सदर पोर्टलवर उपलब्ध माहिती व सूचनेनुसार आपल्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील इयत्ता ११ वी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे शून्य फेरी आणि नियमित कॅप फेरी १ चे वेळापत्रक सोबत सादर करण्यात येत आहे. इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रिया संदर्भात माहिती, सूचना वेळोवेळी प्रवेश प्रक्रियेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

विद्यार्थी/पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी याची नोंद घ्यावी.

या बाबीची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी. ही विनंती.

**अधिकृत पोर्टल**-https://mahafyjcadmissions.in

**ई-मेल आयडी** – support@mahafyjcadmissions.in

**हेल्पलाईन नंबर - ८५३०९५५५६४.**

MPalkar

**(डॉ. महेश पालकर)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळ:** पुणे
**दिनांक:** ०८ मे, २०२६

Scanned with OKEN Scanner

# सन २०२६-२७ ११ वी प्रवेश प्रक्रिया

## शून्य फेरी

| Sr. No. | दिनांक | दिनांक | केंद्रिय प्रवेश प्रक्रिया माहिती |
|---|---|---|---|
| 1 | 08 May 2026 | 10 May 2026 | १. विद्यार्थी नोंदणी व अर्जाचा भाग १ ऑनलाईन सादर करणे. |
| २ | 11 May 2026 | 13 May 2026 | १. शैक्षणिक पात्रतेची माहिती भरून अर्जाचा भाग १ सादर करणे.<br>२. विद्यार्थी एकाच वेळी भाग २ (कोटा) साठी ऑनलाईन अर्ज करू शकतो.<br>(व्यवस्थापन / इन-हाऊस / अल्पसंख्यांक कोट्यासाठी झिरो राउंड)<br>३. विद्यार्थी किमान १ आणि कमाल १० कनिष्ठ महाविद्यालयांची प्राधान्ये भरू शकतो. |
| 2 | 14 May 2026 | 15 May 2026 | तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी (PROVISIONAL GENERAL MERIT LIST) प्रदर्शित करणे |
| 3 | 16 May 2026 | 16 May 2026 | १. तात्पुरत्या गुणवत्ता यादीत हरकती / दुरुस्ती मागण्या असल्यास विद्यार्थी लॉगिनमधील “Grievance Redressal” द्वारे सादर करणे.<br>२. संबंधित उपसंचालक शिक्षण यांच्या मार्फत हरकती / दुरुस्ती मागण्यांचे ऑनलाईन निवारण.<br>३. संबंधित उपसंचालक शिक्षण यांच्याकडून तक्रार निवारण अंतिम करणे. |
| 4 | 18 May 2026 | 19 May 2026 | १. सर्वसाधारण गुणवत्ता यादी अंतिम करणे (एकदाच होणारी प्रक्रिया).<br>२. व्यवस्थापन / इन-हाऊस / अल्पसंख्यांक कोटासाठी झिरो राउंड वाटप. |
| 5 | 19 May 2026 | 19 May 2026 | अल्पसंख्यांक, कोटा, इन-हाऊस व व्यवस्थापन कोटासाठी झिरो राउंड प्रवेशासाठी महाविद्यालयनिहाय यादी विभागाकडून दिली जाईल.रिक्त जागा प्रत्यार्पित करणे |
| 6 | 20 May 2026 | 20 May 2026 | रिक्त जागा प्रदर्शित करणे |
| 7 | 20 May 2026 | 20 May 2026 | पहिल्या फेरीकरीता जागा प्रदर्शित करणे (कोटा जागांसह) |

MPalkar

(डॉ. महेश पालकर )
शिक्षण संचालक,
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

Scanned with OKEN Scanner

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे**
**इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रकिया सन २०२६-२७**
**नियमित कॅप फेरी १ वेळापत्रक**

| अ.क्र. | CAP प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण बाबी | कालावधी | Quota प्रवेश कार्यवाही व सर्वसाधारण बाबी | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १. | • नविन विद्यार्थ्यांची नोंदणी आणि भाग-१ मधील बदल<br>• विद्यार्थी पसंतीक्रम अर्ज भाग-२ भरणे<br>• विद्यार्थी किमान १ आणि जास्तीत जास्त १० कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरणे.<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीक्रम, गुण आणि अर्जामध्ये दिलेल्या लागू आरक्षणानुसार (असल्यास) कनिष्ठ महाविद्यालय दिले जातील. | २१ मे २०२६ सकाळी ०८.०० ते २२ मे सांयकाळी ०६.०० वाजता. | • प्रवेशासाठी नविन विद्यार्थी नोंदणी भाग-१ मध्ये दुरस्ती करणे<br>• विद्यार्थ्यांनी कोटा प्रवेशासाठी (व्यवस्थापन कोटा, संस्था अंतर्गत प्रवेश कोटा व अल्पसंख्याक कोटा) पंसतीक्रम ऑनलाईन नोंदविणे व लॉक करणे.<br>• (नियमित फेरी-१ मध्ये कोट्यांतर्गत प्रवेशासाठी कोटा पसंती अर्ज पुन्हा लॉक करणे आवश्यक आहे.) | प्रवेश अर्ज |
| २. | अलॉटमेंट प्रोसेस | २३ मे, २०२६ ते २६ मे २०२६ | अलॉटमेंट प्रोसस | अलॉटमेंट |
| ३. | • वाटप प्रक्रिया (अलॉटमेंट प्रोसेस) (कॅप फेरी-१)<br>• पोर्टलवर फेरीसाठी कनिष्ठ महाविद्यालय वाटप यादी प्रदर्शित करणे.<br>• विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये प्रवेशासाठी वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांचा तपशिल प्रदर्शित करणे.<br>• कनिष्ठ महाविद्यालयांना वाटप केलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रदर्शित करणे.<br>• प्रवेश फेरीसाठी कटऑफ यादी प्रदर्शित करणे. (पोर्टलवर प्रसिध्द केले जाईल.)<br>• विद्यार्थ्यांना SMS व्दारे संदेश पाठविणे. | २६ मे २०२६ | • कोट्यांतर्गत अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यालयांच्या लॉगिन मध्ये दर्शविणे (इन-हाऊस, व्यवस्थापन, अल्पसंख्याक कोटा)<br>• विद्यालयांनी प्रवेशासाठी कोटा गुणवत्ता यादी/निवड यादी दर्शनी भागात प्रसिध्द करणे. | |
| ४. | • वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयास सहमत असल्यास विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी पुढे जा (proceed for admission)<br>• कागदपत्र पडताळणीसाठी वाटप केलेल्या महाविद्यालयात उपस्थित राहणे आणि विहित शुल्क भरणे इत्यादी. विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे.<br>• महाविद्यालय लॉगिनवर प्रवेशाची पुष्टी, नकार आणि प्रवेश रद्द करणे. | २६ मे, २०२६ ते २८ मे २०२६. | • विद्यालयांनी प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना संपर्क करणे (विद्यालयांनी कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांची निवड झाल्याबाबत व या कालावधीत प्रवेश घेण्यासाठी येण्याबाबत कळविण्यात यावे.)<br>• विद्यार्थ्यांनी कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित करणे (संबंधित कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे.)<br>• विद्यालयांनी पात्र विद्यार्थ्यांचे कोट्यांतर्गत प्रवेश निश्चित करणे (विद्यालयांनी आपल्या विद्यालयात कोट्यांतर्गत प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक संपूर्ण पडताळणी व कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करावे.) | प्रवेश |
| ५. | • रिक्त जागा प्रदर्शित करणे | २९ मे २०२६ | • रिक्त जागा प्रदर्शित करणे | |
| | दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करणे | ३० मे २२०२६ | दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करणे | |

**टीप- वरील वेळापत्रकानुसार प्रत्येक कार्यवाही शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व विद्यार्थ्यांनी वेळेत पूर्ण करावी.**

**(डॉ. महेश पालकर)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, म. रा. पुणे

**स्थळ:** पुणे
**दिनांक:** ०८ मे, २०२६

Scanned with OKEN Scanner